नमुना - 1

( नियम 13 पहा )

जिल्हाधिकारी, जिल्हा अहमदनगर यांचे कार्यालय क्रं कावि/ग्रापं/कार्या8अ/ ८५२ /2019

महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण व निवडणुक घेणे ) नियम 1962 यांचा नियम 13, पोट-नियम (1) या द्वारे प्रदान करणेत आलेल्या अधिकारांचा वापर करुन, मी राहूल व्दिवेदी , जिल्हाधिकारी अहमदनगर, याद्वारे या सोबतच्या अनुसूचीच्या स्तंभ 1 मध्ये निर्दिष्ट करणेत आलेल्या निर्वाचक गणांकडुन ( यात यापुढे त्यांचा ' संबंधीत निर्वाचक गण ' असा करणेत आलेला आहे) केल्या जाणा-या निवडणुकीच्या संबंधात, पुढीलप्रमाणे तारीख, वेळ व जागा निश्चित करीत आहे.

आ) संबंधित निर्वाचक गणांसमोर, उक्त अनुसुचीच्या स्तंभ 2 मध्ये, विनिर्दिष्ट करण्यात आलेली तारीख व वेळ ही संबंधीत निर्वाचक गणाच्या संबंधातील नामनिर्देशनपत्र सादर करण्यासाठी अखेरची तारीख व वेळ असेल,

भ) उक्त अनुसूचीच्या स्तंभ 3 मध्ये, निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली तारीख आणि वेळ संबंधीत निर्वाचक गणाच्या बाबतीत नामानिर्देशनपत्राच्या छाननी साठीची तारीख व वेळ असेल.

ख) उक्त अनुसूचीच्या स्तंभ 4 मध्ये, संबंधीत निर्वाचक गणापुढे, अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली ठिकाणे ही नामनिर्देशनपत्रे सादर करण्याची आणि त्याची छाननी करण्याची ठिकाणे असतील.

ड) उक्त अनुसूचीच्या स्तंभ 5 मध्ये, संबंधीत निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट करण्यात आलेली तारीख ही कर्जत पंचायत समिती साठी व्यक्तीची निवडणुक ज्या तारखेस घेण्यात येईल ती तारीख असेल,

इ) उक्त अनुसूचीच्या स्तंभ 6 मध्ये, निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली वेळ ही ज्यावेळी मतदान घेण्यात येईल ती वेळ असेल,

फ) उक्त अनुसूचीच्या स्तंभ 7 मध्ये निर्वाचक गणापुढे विनिर्दिष्ट केलेली तारीख व वेळ ही, मतमोजणीची तारीख व वेळ असेल.

ग) उक्त अनुसूचीच्या स्तंभ 8 मध्ये, निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली ठिकाणे ही, मतमोजणीची ठिकाणे असतील.

## अनुसूची

| मतदार विभागाचे नाव | नामनिर्देशनपत्र सादर करण्यासाठी शेवटची तारीख व वेळ | नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यासाठी तारीख व वेळ | नामनिर्देशन पत्र सादर करण्याची व त्यांची छाननी करण्याचे ठिकाण | आवश्यक असेल तर ज्या तारखेस मतदान घेण्यात येईल ती तारीख | ज्या वेळेमध्ये मतदान घेण्यात येईल ती वेळ | मतमोजणीसाठी तारीख व वेळ | मतमोजणी करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) |
| 138-कोरेगाव | सोमवार दि.3 जून, 2019 ते शनिवार दि. 8 जून 2019 सकाळी 11 ते दुपारी 3 पर्यत) (बुधवार दि. 05/06/2019 रोजी सार्व.सुट्टी असल्याने नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत) | सोमवार दि. 10 जून 2019 सकाळी 11 वाजल्यापासून | तहसिल कार्यालय कर्जत | रविवार दि.23 जून 2019 | सकाळी 7.30 ते 5.30 पर्यत | सोमवार दि. 24 जून 2019 सकाळी 10.00 | तहसिल कार्यालय कर्जत |

(राहूल द्विवेदी)
जिल्हाधिकारी अहमदनगर

दिनांक- 3/06/2019
ठिकाण:- अहमदनगर